लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.), मुंबई यास व्यवस्थापकीय अनुदान (वेतन) याकरीता सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता अतिरिक्त निधी मंजूर करण्याबाबत.......

## महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:- एलएएस-२०१३/प्र.क्र.४०५/महामंडळे
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २२ जानेवारी, २०१४.

वाचा :- १. शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.पूरक-२०१३/प्र.क्र.३९६/सिकाना अर्थसंकल्प-३, दि.२१ डिसेंबर, २०१३
२. शासन ज्ञापन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:बीजीटी-२०१३/प्र.क्र.१३४/अर्थसंकल्प,दि. ९ जानेवारी,२०१४

शासन निर्णय :- संदर्भ क्र.१ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकान्वये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. मुंबई मार्फत मातंग समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येतात. या महामंडळास सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता वेतनावरील परिगणना लक्षात घेता, भविष्य निर्वाह निधी रु.२०.०० लाख, वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती करीता रु.१०.०० लाख, निवृत्ती व ग्रॅज्युएटी करीता रु.१३५.६६ लाख, मानधन करीता रु.५.०० लाख, रजा वेतन रु.५.०० लाख व अतिकाली भत्ता या करीता रु.५.०० लाख अशी एकूण ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी पुरवणी मागणीद्वारे रु.१.८० कोटी इतकी तरतूद वितरीत करण्यास मंजूरी दिली आहे.

त्यानुसार या शासन निर्णयान्वये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील १६४ कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्चासाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ३६सहायक अनुदाने (वेतन) यासाठी पुरवणी मागणीद्वारे रु.१.८० कोटी (अक्षरी रुपये एक कोटी ऐंशी लाख फक्त) एवढी रक्कम वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. वरील अनुदानाबाबत आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे नियंत्रक अधिकारी राहतील.सदर अनुदानाची रक्कम पुढील कार्यवाहीसाठी प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, नवी मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांस त्वरित संवितरित करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत. त्या देयकावर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकारही त्यांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांस देण्यात येत आहेत.

३. या बाबींवर होणारा खर्च सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतूदीतून खालील लेखाशिर्षाअंतर्गत भागविण्यात यावा :-

मागणी क्रमांक एन-३
२२२५-अनुसूचित जाती,
अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण-०१,
अनुसूचित जातीचे कल्याण ८०० इतर खर्च,
(१०) (००) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या.
३६ सहाय्यक अनुदान (२२२५ २३१ ७)

कृ.प.मा...

४. हा शासन निर्णय, शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.पूरक-२०१३/प्र.क्र.३९६/सिकाना/ अर्थसंकल्प-३, दि.२१ डिसेंबर, २०१३ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र.पां.लुबाळ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, नवी मुंबई (दोन प्रती)
व्यवस्थापकीय संचालक , लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ / २, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई, ठाणे.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, नवी मुंबई.
वित्त विभाग, (का व्यय १४/अर्थसंकल्प-३), मंत्रालय, मुंबई.
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, पाचवा मजला, मंत्रालयासमोर,मुंबई - ३२
अवर सचिव, (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई३२.
कक्ष अधिकारी, (नियोजन), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई३२.
निवड नस्ती का-महामंडळ

दिनांक 23/1/14